| MHAK100012662022 | दाखल तारीख -१९.१०.२०२२<br>नोंदणी तारीख - १९.१०.२०२२<br>निर्णय तारीख - २७.०३.२०२६<br>कालावधी - ०३ ०५ ०८<br>वर्ष महिने दिवस |
|---|---|

# न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, कोर्ट नं.२ पातुर, जि.अकोला यांचे न्यायालय

(पिठासीन अधिकरी - संदीप भा. मोरे )
(पारित दिनांक - २७.०३.२०२६)

**नियमीत फौ.ख.क्र. १९२/२०२२.** **निशाणी क्रमांक: २३**

प्रथम खबरी अहवालाचा तपशील

अपराध क्रमांक : २५३/२०२२, दिनांक : २६.०७.२०२२

पोलीस स्टेशन : पातुर, ता. पातुर, जि.अकोला.

| | |
|---|---|
| तक्रारकर्ता | **महाराष्ट्र शासन तर्फे** पोलीस स्टेशन अधिकारी,<br>पोलीस स्टेशन, पातुर, जि.अकोला.<br>**मुळ तक्रारकर्ताः नायबराव बाबाराव दुतोंडे**<br>रा. शिवनगर, पातुर ता. पातुर<br>जि. अकोला |
| महाराष्ट्र शासन/फिर्यादी तर्फे सादरकर्ता | श्री टी.एस. सिरसाट<br>सहाय्यक सरकारी अभियोक्ता. |
| आरोपी | **१. लखन बाबाराव दुतोंडे**<br>वय ३२ वर्षे, कामधंदा- मजूरी,<br>**२. शोभा बाबाराव दुतोंडे**<br>वय ५५ वर्षे, कामधंदा- मजूरी,<br>दोन्ही रा. शिवनगर, पातूर ता. पातुर<br>जि. अकोला |
| आरोपींकरिता/तर्फे सादरकर्ता | विधिज्ञ श्रीमती आर.डी. राउत |
| गुन्हा घडल्याची तारीख | २६.०७.२०२२ |
| गुन्हा नोंदणी तारीख | २६.०७.२०२२ |

| | |
|---|---|
| दोषारोपपत्र दाखल तारीख | १९.१०.२०२२ |
| दोषारोप निश्चित तारीख | ०६.०३.२०२६ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | २७.०३.२०२६ |
| प्रकरण न्यायनिर्णयाकरिता ठेवलेली तारीख | --- |
| न्यायनिर्णयाची तारीख | २७.०३.२०२६ |
| शिक्षा दिल्याची तारीख, जर असेल तर | लागु नाही. |

## आरोपीचा तपशील

| आरोपीचा अ.क्र. | आरोपीचे नाव | अटक तारीख | जमानतवर सोडल्याची तारीख | गुन्हा ठेवल्याचा तपशील | निर्दोष मुक्त केले किंवा शिक्षा केली. | किती शिक्षा दिली. | खटला चालु असतांना आरोपी कारागृहात असल्याबाबतचा तपशील |
|---|---|---|---|---|---|---|---|
| आ.१<br><br>आ. २ | **रमेश सुर्यभान बाबर**<br><br>**शोभा बाबाराव दुतोंडे** | समजपत्र<br><br>समजपत्र | २७.०३.२०२६<br><br>२७.०३.२०२६ | भादंवि कलम ३२४, ५०४, सह कलम ३४ | निर्दोष मुक्त केले. | लागु नाही. | लागु नाही. |

## सरकारपक्षातर्फे नोंदविलेल्या साक्षीदारांची यादी

| अ.क्र. | नाव | साक्षीचे स्वरुप |
|---|---|---|
| स.सा.क्र.१ | नायबराव बाबुराव दुतोंडे (नि.क्र.१९) | फिर्यादी |

## बचावपक्षातर्फे नोंदविलेल्या साक्षीदारांची यादी

| अ.क्र. | नाव | साक्षीचे स्वरुप |
|---|---|---|
| ब.सा.क्र.१ | निरंक | निरंक |

**न्यायालयातर्फे नोंदविलेल्या साक्षीदारांची यादी**

| अ.क्र. | नाव | साक्षीचे स्वरुप |
|---|---|---|
| न्या.सा.क्र.१ | निरंक | निरंक |

**सरकारपक्षातर्फे निशाणी क्रमांक दिलेल्या कागदपत्रांची यादी**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्रांचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | नि.क्र. २० | जबानी रिपोर्ट सहीच्या  हद्यीपूरते |
| २ | नि.क्र. २१ | छापील फिर्याद सहीच्या  हद्यीपूरते |

**बचावपक्षातर्फे मान्य केलेल्या कागदपत्रांची यादी**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्रांचे स्वरुप |
|---|---|---|
| | निरंक | निरंक |

**बचावपक्षातर्फे निशाणी क्रमांक दिलेल्या कागदपत्रांची यादी**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्रांचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

**न्यायालयातर्फे निशाणी क्रमांक दिलेल्या कागदपत्रांची यादी**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्रांचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

**मटेरीअल ऑब्जेक्ट/महत्वाच्या वस्तु**

| अ.क्र. | मटेरीअल ऑब्जेक्ट/महत्वाच्या वस्तु क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

## - न्या य नि र्ण य -

(पारीत दिनांक - २७.०३.२०२६)

आरोपीं विरुध्द भारतीय दंड विधान कलम ३२४,५०४ सह कलम ३४ अन्वये शिक्षेस पात्र गुन्हयाच्या आरोपासाठी अभियोग चालविला जात आहे.

## अभियोगपक्षाचे थोडक्यात कथनः

**०२.** सरकारपक्षाचे थोडक्यात म्हणणे असे की, दिनांक २६.०७.२०२२ रोजी संध्याकाळ ७.३० वाजताच्या दरम्यान फिर्यादी ही त्यांच्या घरासमोर असतांना त्यांचा लहान भाउ लखन हा त्याचे हातात लोखंडी पाईप घेवून त्यांचे जवळ आला व त्यांना म्हणत होता की, मी तुझे पत्नीला ५०० रूपये उसने दिले होते, ते मला आत्ताच परत करा. तेव्हा फिर्यादीने लखन ला म्हटले की, मी तुला २००० रूपये उसने दिले आहे, त्यामधून ५०० रूपये घे व तुच मला १५०० रूपये परत कर असे म्हटले असता लखन याने अचानक त्याच्या हातातील लोखंडी पाईपने त्यांच्या छातीवर मारून जखमी केले, तसेच त्यांच्या आईने त्यांना व त्यांचे पत्नीला शिवीगाळ केली. फिर्यादी यांना छातीला मार लागल्यामूळे ते व त्यांची पत्नी हे त्यांचे लहान भाउ नामे लखन व आई शोभा यांचे दोघांचे विरूध्द पोलीस स्टेशन पातुर येथे जाउन फिर्याद नोंदविली.

## अन्वेषण व दोषारोपः

**०३.** सदर फिर्यादवरुन फौजदारी प्रक्रिया संहितेच्या **कलम १५४** अन्वये पातुर पोलीस ठाण्याच्या ठाणे अंमलदार यांनी आरोपींवर गुन्हा क्रमांक २५३/२०२२ ची नोंद भारतीय दंड विधान कलम ३२४, ५०४, सह कलम ३४ अन्वये केली. गुन्हयाचा तपास पो.हे. कॉ. दिलीप संपत इंगळे यांच्याकडे देण्यात आला. तपासादरम्यान तपासी अधिकारी यांनी घटनास्थळ, जप्ती पंचनामा, जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत करुन, साक्षीदारांचे बयाण नोंदविले व त्यानुसार आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान कलम ३२४, ५०४, सह कलम ३४ अन्वये फौजदारी प्रक्रिया संहितेच्या **कलम १७३(२)** दोषारोपपत्र दाखल केले.

## <u>खटला सुरुः</u>

**०४.** आरोपी हजर झाल्यानंतर त्याच्या विरुध्द निशाणी क्रमांक **१४** वर भारतीय दंड विधान कलम ३२४, ५०४ सह कलम ३४ प्रमाणे शिक्षेस पात्र गुन्हयाच्या आरोपासाठी दोषारोप निर्धारीत केले. वकीलांच्या उपस्थितीमध्ये आरोपींना ते त्यांच्या बोलीभाषेत वाचुन व समजावून सांगीतले. त्यावर आरोपींनी त्यांना गुन्हा कबुल नसल्याचे सांगुन अभियोगाची मागणी केली.

## <u>साक्ष पुरावाः</u>

**०५.** फौजदारी प्रक्रिया संहिला **कलम २४२** अन्वये अभियोगपक्षातर्फे फिर्यादी व प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांना साक्षीदार म्हणुन तपासण्यात आले. अभियोगपक्षाच्या साक्षीदाराची साक्ष तपासणी केल्यानंतर आरोपींविरुध्द पुरावा न आल्यामुळे आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता **कलम ३१३(१)(ब)** अन्वये निवेदन माफ करण्यात आले, तसेच आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता **कलम २४३** प्रमाणे स्वतःच्या बचावार्थ कुठलाही साक्ष पुरावा दिला नाही.

## <u>मुद्दे व निष्कर्षः</u>

**०६.** सरकारपक्षाचा व आरोपींच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. एकंदर संचिकेतील पुरावा व कादगपत्रे पाहता खालील मुद्दे माझ्या निष्कर्षासाठी उपस्थित होतात. त्यावरील उत्तरे मी खाली नमुद कारणांसहित देत आहे.

| <u>अ. क्र.</u> | <u>मुद्दे</u> | <u>निष्कर्ष</u> |
|---|---|---|
| १. | सरकारपक्ष हे सिध्द करतो काय की, दिनांक २६.०७.२०२२ रोजी सायंकाळी ७.३० वाजताचे दरम्यान शिवनगर, पातुर ता. पातुर जि. अकोला येथे आरोपींनी संगनमत | |

| | | |
|---|---|---|
| | फिर्यादीला लोखंडी पाईपने मारले जे गुन्हयाचे हत्यार म्हणून वापरल्यास जीवघेणे ठरु शकते मारहाण करुन इच्छापूर्वक दुखापत पोहचविली व त्यायोगे त्याने भारतीय दंड विधानाचे कलम ३२४ सह कलम ३४ प्रमाणे शिक्षेस पात्र असलेला गुन्हा केला ? | **...नाही.** |
| २. | सरकारपक्ष हे सिध्द करतो काय की, वर नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगनमत करून फिर्यादीला शिवीगाळ करुन अपमानीत केले व त्यांना प्रक्षोभित केले आणि अशाप्रकारच्या प्रक्षोभनामुळे त्यांच्याकडुन सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा किंवा अन्य कोणताही अपराध घडावा असा त्यामागे उद्देश होता व त्यायोगे त्याने भारतीय दंड विधानाचे कलम ५०४ सह कलम ३४ प्रमाणे शिक्षेस पात्र असलेला गुन्हा केला ? | **...नाही.** |
| ३. | आदेश काय ? | **आरोपींना निर्दोष मुक्त केले.** |

## <u>का र ण मिं मा सा</u>

**<u>साक्षीदार फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ३४४ अन्वये कारवाईस पात्र आहेत काय?</u>**

**०७.** सदरच्या प्रकरणामध्ये फिर्यादी, साक्षीदार व आरोपी हे एकाच गावातील व नातेवाईक आहेत. फिर्यादी व आरोपी यांच्या दरम्यान सदरचे प्रकरण आपसी झाले असल्यामुळे त्यांच्यतील वाद हा संपूष्टात आलेला आहे. अशा परिस्थितीमध्ये सामाजीक हित आणि गावपातळीवर शांतता व सलोखा टिकुन

राहण्याकरिता साक्षीदारावर कुठलीही कारवाई फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३४०, ३४४ अन्वये न करणे न्याय व हिताचे ठरेल.

## मुद्दा क्रमांक १ ते २ करिताः–

०८. सदर दोन्ही मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्याने पुराव्याची व चर्चेची पुनरावृत्ती होउ नये म्हणुन ते सर्व एकत्रीत चर्चेकरिता घेण्यात येत आहेत. अभियोगपक्षाला आपल्या पुराव्यातुन संपरिक्षेत सर्व गुन्हयांचे घटक स्पष्टपणे सिध्द करावे लागतात. असे असतांना अभियोगपक्षाला आपल्या साक्षीदारांच्या कथनाचा आधार घ्यावा लागतो. त्याचप्रमाणे अभियोगपक्षाला हि काळजी घ्यावी लागते की, त्याने सादर केलेल्या पुराव्यांमध्ये कुठलीही वाजवी शंका निर्माण होउ नये. असा संशय किंवा शंका कितीही सौम्य स्वरुपाची असली तरी ती वाजवी असेल तर अभियोगपक्षाला मारक ठरते आणि त्याचा फायदा निश्चीतच आरोपीच्या दोषमुक्तीसाठी होतो. त्याचबरोबर अभियोगपक्षांच्या साक्षीदारांमध्ये एकवाक्यता देखील असणे तितकेच महत्वाचे ठरते त्यामुळे अभियोगपक्षाच्या पुराव्याचे अत्यंत बारकाईने परिनिरीक्षण करणे हे न्यायालयाचे कर्तव्य ठरते.

०९. आरोपींविरुध्द गुन्हा शाबीत करण्यासाठी अभियोगपक्षाने वरीलप्रमाणे साक्षीदार तपासले असुन फिर्यादी साक्षीदार क्र.१ **नायबराव बाबाराव दुतोंडे** यांनी त्यांच्या पुराव्यात कथन केले की, आरोपी क्र. १ त्यांचा भाउ आहे. आरोपी क्र. २ आई आहे. घटना सायंकाळच्या वेळी त्यांच्या घरासमक्ष घडली होती. आरोपी व त्यांच्यात मुलांच्या कारणावरून किरकोळ वाद झाला होता. त्यांनी रागाच्या भरात रिपोर्ट दिला होता. फिर्यादीने जबानी रिपोर्ट व छापील पहिली खबर यांवरील त्यांचा सही ओळखली परंतु त्यांतील मजकुर त्यांना माहित नसल्याचे कथन केले.

**१०.** फिर्यादी साक्षीदार क्रमांक १ नायबराव दुतोंडे अभियोगपक्षास सहकार्य करत नसल्यामुळे सरकारी अभियोक्ता यांच्या तोंडी विनंतीवरुन त्यांना भारतीय साक्षपुरावा अधिनियमचे **कलम १५४** अन्व्ये उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली. त्यानुसार फिर्यादीने अभियोगपक्षाचे कथन पुर्णपणे फेटाळुन लावले. सदर फिर्यादी साक्षीदाराने उलटतपासात त्याने त्याच्या प्रथम खबरी अहवालामध्ये तसेच पोलीसांना दिलेल्या जबाबामध्ये सांगीतलेला संपुर्ण मजकुर नाकारला आहे. अभियोग पक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासामध्ये साक्षीदाराने **नि.१८** वर असलेली आपसी तडजोड पूरसीसवरील सही ओळखली.

**११.** एकंदरीतच फिर्यादी तसेच प्रत्यक्षदर्शी साक्षीदार जो की, कुठल्याही फौजदारी प्रकरणाचा केंद्रबिंदु असतो व ज्याच्या पुराव्यामुळे आरोपींविरुध्द ठेवण्यात आलेले दोषारोप सिध्द केले जाउ शकतात, परंतु हाती असलेल्या खटल्यामध्ये फिर्यादीच्या व प्रत्यक्षदर्शी साक्षीदाराचा सरतपास व उलटतपासामध्ये कुठलाही विश्वासार्ह सबळ असा पुरावा आरोपींविरुध्द आलेला नाही. फिर्यादी यांनी जरी अभियोगपक्षाला सरतपासामध्ये सहकार्य केले नसले तरी इतर कुठलाही स्वतंत्र साक्षीदार किंवा पुरावा अभियोगपक्षाव्दारे अभिलेखावर आलेला नाही. संधी देउनही अभियोगपक्ष कुठलाही स्वतंत्र साक्षीदार तपासू न शकल्यामुळे तसेच फौजदारी प्रक्रिया संहिताचे **कलम ३११** अन्वये न्यायालयाला सुध्दा खटल्याचा निर्णय न्याय्यपणे होण्यासाठी कोणत्याही व्यक्तीचा साक्षपुरावा आवश्यक वाटत नाही. त्याचबरोबर फिर्यादी व आरोपी यांचे आपसी पूरसीस अभिलेखावर दाखल असल्यामुळे तसेच सरकारी अभियोक्ता यांच्या तोंडी विनंतीवरून प्रकरणात इतर साक्षीदार जे की, फिर्यादी साक्षीदार यास सहयोगी

साक्षीदार आहेत त्यांना न तपासता अभियोगपक्षाचा पुरावा नि.०१ खाली आदेश करुन बंद करण्यात आला.

**१२.** वरील कारणमिमांसेवरुन व एकंदरीत केलेल्या उहापोहावरुन असे स्पष्ट दिसुन येते की, आरोपींविरुध्द वरील गुन्हा सिध्द करण्यासाठी कोणतेही संयुक्तीक, सबळ व विश्वसनिय पुरावा अभिलेखावर आलेला नाही. दोषारोप संशयापलीकडे सिध्द करण्याची जबाबदारी ही अभियोगपक्षाची असते, ज्यामध्ये अभियोगपक्ष पूर्णपणे अपयशी ठरला आहे. त्यामुळे आरोपींनी घटनेच्यादिवशी फिर्यादीला चाकूने मारून, शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिल्याची घटना शाबीत करण्यास सरकारपक्ष पुर्णपणे अपयशी ठरला असल्याने, मी मुद्दा क्रमांक १ ते २ निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्रमांक ३ करीताः</u>**

**१३.** वरील मुद्दा क्र.१ ते २ चे नकारार्थी निष्कर्ष पाहता आरोपी हे ठेवलेल्या दोषारोपांमधुन निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. जप्त मुद्देमाल एक लोखंडी पाईप हा मुल्यहीन असल्याने त्याचा अपील कालावधीनंतर फौजदारी प्रक्रिया संहिता **कलम ४५२** अन्वये नियमानुसार नष्ट करणे न्यायोचित राहील. सदरील प्रकरणामध्ये आरोपी व फिर्यादी यांच्यामध्ये तडजोड झाली असल्या कारणाने तसेच पिडीत व्यक्तीला पुर्नवसनाची गरज नसल्यामुळे फौजदारी प्रक्रिया संहिता **कलम ३५७–अ** प्रमाणे पिडीत व्यक्ती नुकसान भरपाई मिळण्यास पात्र नाही. अभियोग पक्षाने जर सदर न्यायनिर्णया विरुध्द अपील केले तर अपीलेट न्यायालयाकडे हजर राहण्यासाठी आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ प्रमाणे जामीन देणे गरजेचे आहे. सदर जामीन हा पुढील सहा

महिन्यांकरिता वैध राहिल. या सर्व कारणांचा विचार करता मी खालील प्रमाणे आदेश पारीत करत आहेः

## आ दे श

१) **आरोपी क्र. १ लखन बाबाराव दुतोंडे आरोपी क्र.२ शोभा बाबाराव दुतोंडे** यांची फौजदारी प्रकिंया संहिता **कलम २४८(१)** अन्वये भारतीय दंड विधान कलम ३२४, ५०४ सह कलम ३४ च्या दोषारोपातुन निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२) फौजदारी प्रकिंया संहिता **कलम ४३७** अन्वये घेण्यात आलेला आरोपीचा वैयक्तीक जात मुचलका व जामीन कदबा रद्द करण्यात येत आहे.

३) फौजदारी प्रकिया संहिता कलम ४५२ अन्वये जप्त मुद्येमाल एक लोखंडी पाईप हा मुल्यहीन असल्याने त्याचा अपील कालावधीनंतर फौजदारी प्रक्रिया संहिता **कलम ४५२** अन्वये नियमानुसार नष्ट करण्यात यावा.

४) आरोपीने फौजदारी प्रक्रीया संहिता **कलम ४३७–अ** प्रमाणे प्रत्येकी रुपये १५,०००/– चा जामीन दयावा.

५) सदरच्या न्यायनिर्णयाची प्रत मा.उच्च न्यायालय यांनी '**रंजना सुर्यवंशी विरुध्द जयप्रकाश गुप्ता, क्रि.अपील क्र.३९०/२०१९ मधील क्रि.अर्ज क्र.३८०/२०१९**' यामध्ये घालुन दिलेल्या दिशानिर्देशानुसार पुढील कार्यवाहीकरिता जिल्हाधिकारी, अकोला यांना पाठविण्यात यावे.

(न्यायनिर्णय हा आरोपी व त्यांच्या वकीलांच्या हजेरीत फौजदारी प्रक्रिया संहिता **कलम ३५३** अन्वये खुल्या न्यायालयात जाहिर करण्यात आला.)

SANDIP BHASKARRAO MORE　Digitally signed by SANDIP BHASKARRAO MORE Date: 2026.04.04 18:25:33 +0530

पातुर　　　　**( संदीप बी. मोरे )**
दिनांक –२७.०३.२०२६.　　　　न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, पातुर

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. File Order/Judgment are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | K.M.Mahalle |
| Name of the Court | Sandip B. More,<br>Jt. C.J.J.D. & J.M.F.C.,Patur. |
| Date of Order/Judgment | 27. 03.2026 |
| Order/Judgment signed by the P.O on | 27. 03.2026 |
| Judgment/Order uploaded on | 04. 04.2026 |